सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

# सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.

## महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९

(दिनांक २५ मार्च १९९६ पर्यंत सुधारलेला)

# MAHARASHTRA ACT No. XXXVI OF 1989

## MAHARASHTRA SALES TAX ON TRANSFER OF PROPERTY IN GOODS INVOLVED IN THE EXECUTION OF WORKS CONTRACTS (RE-ENACTED) ACT, 1989

**(As modified upto 25th March 1996)**

[ Price Rs. 3-00 ]

# महाराष्ट्र कार्यकंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम १९८९

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

## प्रकरण एक

### प्रारंभिक


१ संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

२ व्याख्या


## प्रकरण दोन

### कराचा भार व कर बसवणे


३ कराचा भार

४ व्यापाऱ्यांचे दायित्व

५ व्यापाऱ्याकडून देय असलेला कर

५अ. विक्रीच्या उलाढालीच्या रकमेची विभागणी करण्याची सुविधा

६ कर बसवणे

६अ कराचा आपसमेळ

७ प्रकर्ता व अभिकर्ता यांचे संयुक्त व पृथक, दायित्व


## प्रकरण तीन

### नोंदणी


८ नोंदणी


## प्रकरण चार

### मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी लागू असणे


९ मुंबई विक्रीकर अधिनियमाखालील प्राधिकरणांना या अधिनियमान्वये कराची आकारणी, फेरआकारणी इत्यादी करण्यासाठी अधिकार प्रदान


## प्रकरण पाच

### संकीर्ण आणि नियम


१० विवक्षित विक्री ही करासाठी पात्र नसणे.

११ नियम करण्याचा अधिकार

१२ अडचणी दूर करण्याचे अधिकार

## प्रकरण सहा

### संक्रमणात्मक आणि विशेष तरतुदी


१३ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याचे निरसन.

१४ काही विवक्षित कार्यकंत्राटाच्या बाबतीत कर न बसवणे.

१५ निरसित अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र नसलेली व्यक्ती विनिर्दिष्ट कालावधीमध्ये कर भरण्यास पात्र असणार नाही.

१६ निरसित अधिनियमान्वये भरलेला कर किंवा जादा कर परत करणे.

१७ नवीन एकत्रीकृत विवरण दाखल करणे.

१८ आकारणी करण्याकरिता मुदत मर्यादेची संगणना.

१९ आकारणी आदेश

२० विनिर्दिष्ट मुदतीकरिता कराचा आपसमेळ

२१ नोंदणी प्रमाणपत्राची वैधता व परिणामकारकता

२२ विवक्षित परिस्थितीमध्ये दोषसिद्धीसाठी व्यक्ती पात्र न ठरणे.


## अनुसूची

# सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.

[महाराष्ट्र राज्यातील कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या (मालाच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील) हस्तांतरणावर कर बसवणे व तो वसूल करणे यासाठी अधिनियम.]

(या अधिनियमास राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर तो "महाराष्ट्र शासन राजपत्रा" मध्ये दि. नोव्हेंबर १९८९ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.)

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (१ जानेवारी १९९२)*
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (१ जानेवारी १९९२)*
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

१९८५ चा महा. १९. ज्याअर्थी, महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ यात, महाराष्ट्र राज्यातील कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या (मालाच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील) हस्तांतरणावर कर बसवण्याची व तो वसूल करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने, दिनांक ३१ मार्च १९८९ रोजी निकाल दिलेला रिट विनंती अर्ज क्रमांक १९८७ चा १०६०, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया आणि इतर विरुद्ध भारतीय संघराज्य व इतर यात (इतर अनेक रिट अर्जासह) इतर गोष्टींबरोबरच असा निर्णय दिला आहे की, कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या (मालाच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील) हस्तांतरणावर कर बसविण्यासंबंधात राज्यांच्या विधान मंडळांनी संमत केलेले विक्रीकर कायदे हे संविधानाचा अनुच्छेद २८६ याच्या प्रत्येक खंडामध्ये किंवा उपखंडामध्ये नमूद करण्यात आलेल्या निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीन आहेत ; (१९८५ चा महा. १९.)

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेला, महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी अनुरूप करणे आवश्यक आहे.

आणि म्हणून ज्याअर्थी, १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ हा ज्या तारखेस अंमलात आला होता त्या १ ऑक्टोबर १९८६ या तारखेपासून भूतलक्षी प्रभावासह, सातत्य राखणे आणि त्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ याच्या जागी नवीन अधिनियम करणे, आणि कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावर दिनांक १ ऑक्टोबर १९८६ पासून कर बसविणे व तो वसूल करणे आणि विवक्षित आनुषंगिक व परिणामस्वरूप तरतुदी करणे इष्ट आहे ; (१९८५ चा महा. १९.)

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चाळीसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनिमास, महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १ ऑक्टोबर १९८६ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधिनियमात,— व्याख्या.

(१) (अ) "नियत दिवस" याचा अर्थ, १ ऑक्टोबर १९८६ असा आहे;

* ही खूण अधिनियमाची प्रारंभाची तारीख दर्शविते.

एच ४२८३—२ (१०६१—६—९७)

(ब) "मुंबई विक्रीकर अधिनियम" याचा अर्थ, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ असा आहे ; १९५९ चा मुंबई ५१.

(क) "आयुक्त" याचा अर्थ, मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली विक्रीकर आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती असा आहे ;

(ड) "व्यापारी" याचा अर्थ, जी कोणतीही व्यक्ती कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्ता ही, मूल्यवान प्रतिफल, अडत (कमिशन), पारिश्रमिक घेऊन किंवा अन्यथा हस्तांतरीत करते अशी कोणतीही व्यक्ती असा आहे आणि या संज्ञेत जे याप्रमाणे अशा मालातील मालमत्तेचे हस्तांतरण करते असे राज्य शासन, केंद्र शासन आणि तसेच जी कोणतीही सोसायटी, क्लब किंवा व्यक्तिसंघ आपल्या सदस्यास अशा मालातील मालमत्तेचे हस्तांतरण करते त्यांचा समावेश होतो;

(ई) "घोषित माल" याचा अर्थ, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ यामध्ये व्याख्या करण्यात आल्यानुसार असलेला घोषित माल असा आहे ; १९५६ चा महा. ७४.

(फ) "माल" याचा अर्थ, कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेली प्रत्येक प्रकारची मालमत्ता (मग ती मालाच्या स्वरूपात असो किंवा कोणत्याही अन्य स्वरूपात असो) असा आहे ;

(ग) "व्यक्ती" या संज्ञेत कोणतीही कंपनी किंवा माणसांचा निकाय मग तो विधिसंस्थापित असो किंवा नसो, हिंदू अविभक्त कुटुंब, भागीदारी संस्था, स्थानिक प्राधिकरण आणि तसेच केंद्र सरकार व कोणतेही राज्य शासन यांच्या मालकीचे असलेले किंवा त्यांनी स्थापन केलेले किंवा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाच्या अधीन असलेले महामंडळ, कंपनी, निकाय अथवा प्राधिकरण यांचा समावेश आहे ;

(ह) "विहित" याचा अर्थ, विहित केलेले असा आहे.

(आय) "खरेदी किंमत" याचा अर्थ राज्यात किंवा आंतरराज्यीय धंद्याच्या किंवा व्यापाराच्या ओघात किंवा आयातीच्या ओघात केलेल्या कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीच्या संबंधात कोणत्याही मालाच्या खरेदीसाठी व्यक्तीने दिलेली किंवा तिच्याकडून देय असलेली मूल्यवान प्रतिफलाची रक्कम, व तसेच विक्रेत्याने मालाच्या पोचवणीच्या वेळी किंवा पोचवणीपूर्वी मालाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल आकारण्यात आलेली कोणतीही रक्कम असा आहे, आणि त्यामध्ये, अशा मालाच्या संबंधात प्रदान करण्यात आलेली किंवा देय असलेली वाहणावळ, मार्गक्रमण किंवा विमा यांच्या खर्चाचा आणि कोणतेही कर, शुल्क, उपकर व फी यांच्या खर्चाचाही समावेश होईल---मग अशी रक्कम स्वतंत्ररीत्या आकारण्यात आलेली असो किंवा नसो ;

(ज) "नोंदलेला व्यापारी" याचा अर्थ, कलम ८ अन्वये नोंदलेला व्यापारी असा आहे ;

(क) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम असा आहे ;

(ल) "विक्री" याचा अर्थ, राज्यातील कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेचे हस्तांतरण असा आहे (मग ते मालाच्या स्वरूपात केलेले असो किंवा कोणत्याही अन्य स्वरूपात केलेले असो), आणि "विक्री करणे" या संज्ञेचे व्याकरणिक रुपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांचा सुद्धा तद्नुसार अर्थ लावण्यात येईल ;

स्पष्टीकरण.---या खंडाच्या प्रयोजनार्थ, कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेला हस्तांतरीत माल कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीसाठी त्या मालाचा उपयोग, विनियोग किंवा यथास्थिति, विनियोजन करण्याच्या वेळी महाराष्ट्र राज्यात असेल तर, त्या मालातील मालमत्तेचे हस्तांतरण महाराष्ट्र राज्यात करण्यात आले असे मानण्यात येईल---मग कार्य-कंत्राटांचा करार कोणत्याही ठिकाणी करण्यात आलेला असो आणि संबंधित पक्षाची संमती असा उपयोग, विनियोग किंवा विनियोजन करण्यापूर्वी घेतलेली असो वा त्यानंतर घेतलेली असो ;

(म) कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या (मग ती मालाच्या स्वरूपातील असो वा अन्य कोणत्याही स्वरूपातील असो) हस्तांतरणासंबंधात "विक्रीची किंमत" याचा अर्थ राज्यामध्ये अथवा आंतरराज्यीय धंद्याच्या वा व्यापाराच्या ओघात अथवा आयातीच्या ओघात ज्या मालाची खरेदी केली असेल त्या मालाच्या खरेदीसंबंधात व्यापाऱ्याने

दिलेल्या किंवा त्यांच्याकडून देय असलेल्या खरेदीच्या किंमतीची रक्कम असा असून त्यामध्ये राज्यामधील कार्य-कंत्राटांची अंमलबजावणी करताना जो माल, यथास्थिति, राज्याबाहेरील ठिकाणाहून हस्तांतरित केला असेल, वापरला असेल, उपयोजित केला असेल किंवा विनियोजित केला असेल (मग ज्या स्वरूपात तो माल खरेदी केला त्याच स्वरूपात तसे केलेले असो व अन्य कोणत्याही स्वरुपात तसे केलेले असो) त्या मालाच्या मूल्याचा समावेश होतो ;

[१][(म-१) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमाची अनुसूची असा आहे;]

(न) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य असा आहे.

[२][(न-१) "कर" याचा अर्थ, या अधिनियमान्वये देय असलेला कर असा आहे, आणि त्यात कराच्या रकमेऐवजी तडजोड म्हणून देय होणाऱ्या रकमेचा समावेश होतो].

(ओ) "खरेदीची उलाढाल" याचा अर्थ व्यापाऱ्याने कोणत्याही कालावधीमध्ये केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत त्याने केलेल्या कोणत्याही मालाच्या खरेदीच्या संबंधात दिलेल्या किंवा त्यांच्याकडून देय असलेल्या खरेदी किमतीच्या रकमेमधून, विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या कोणत्याही मालाच्या बाबतीत विक्रेत्याने कोणत्याही खरेदी किमतीच्या रकमेचा व्यापाऱ्याला परतावा दिलेला असल्यास आणि विहित कालावधीमध्ये ती रक्कम त्याला परत केलेली असल्यास ती रक्कम वजा केल्यानंतरची खरेदी किमतीची एकूण रक्कम असा आहे;

(पी) "विक्रीची उलाढाल" याचा अर्थ कोणत्याही कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत मग त्या कंत्राटाची अंमलबजावणी कोणत्याही कालावधीमध्ये पूर्णत: केलेली असो वा अंशत: केलेली असो—अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या कोणत्याही हस्तांतरणासंबंधात व्यापाऱ्याला मिळालेल्या किंवा मिळण्याजोग्या विक्री किमतीची एकूण रक्कम असा आहे ;

(क्यू) "वर्ष",—

(एक) याचा अर्थ वित्तीय वर्ष असा आहे ;

(दोन) कोणत्याही विशिष्ट नोंदलेल्या व्यापाऱ्याच्या संबंधात, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ (कलम ३ व ८ वगळून) त्याचा अर्थ त्या व्यापाऱ्याचे हिशेब त्याच्या वह्यांमध्ये सर्वसाधारणपणे ज्या वर्षास अनुलक्षून ठेवण्यात येतात ते वर्ष असा आहे मात्र याबाबतीत लेखी अधिकथन देऊन व्यापारी वित्तीय वर्षाचा विकल्प स्वीकारू शकेल ;

परंतु, नोंदलेल्या व्यापाऱ्याने असा विकल्पाधिकार एकदा वापरलेला असल्यास, त्याला, आयुक्ताच्या संमतीखेरीज व आयुक्त ठरवतील त्या शर्ती अनुसरल्याखेरीज, त्याबाबतीत कोणताही बदल करता येणार नाही ;

(२) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना, मुंबई विक्रीकर अधिनियमामध्ये त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

## प्रकरण दोन

### कराचा भार व कर बसवणे

३. (१) ज्या व्यापाऱ्याची,— **कराचा भार.**

(अ) ३१ मार्च १९८६ रोजी संपणाऱ्या वर्षातील किंवा,

(ब) १ एप्रिल १९८६ रोजी सुरू होणाऱ्या वर्षातील.

एकतर सर्व खरेदीची किंवा सर्व विक्रीची उलाढाल दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा अधिक झाली असेल किंवा होत असेल असा प्रत्येक व्यापारी, नियत दिवशी किंवा त्यानंतर पोटकलम (३)

---

१. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १७ याच्या कलम ९ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

अन्वये कर भरण्याचे दायित्व संपेपर्यंत, त्याच्याकडून झालेल्या विक्रीच्या उलाढालीवर या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असेल :

परंतु, ज्यास उप-खंड (अ) लागू होत नाही परंतु उप-खंड (ब) लागू होतो आणि ज्याची नियत दिवसाच्या नंतरची एकतर सर्व खरेदीची किंवा सर्व विक्रीची उलाढाल पहिल्या प्रथम दोन लाख रुपये या मर्यादेपेक्षा अधिक होते तो व्यापारी, १ एप्रिल १९८६ या दिवसापासून गणना केली असता जेव्हा त्याच्या खरेदीची किंवा विक्रीची उलाढाल प्रथम अशा मर्यादेपेक्षा अधिक होईल त्या वेळेपर्यंत झालेल्या विक्रीच्या बाबतीत कर भरण्यास पात्र नसेल.

(२) ज्या व्यापाऱ्याच्या बाबतीत, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या वर्षाच्या नंतर १ एप्रिल या दिवसापासून सुरू होणाऱ्या पुढील वर्षातील एकतर सर्व खरेदीची किंवा झालेल्या सर्व विक्रीची उलाढाल, प्रथम, त्या पोट-कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक होईल असा प्रत्येक व्यापारी, पोट-कलम (३) अन्वये कर भरण्याचे दायित्व संपेपर्यन्त, ज्या दिनांकास ही उलाढाल प्रथम अशा मर्यादेपेक्षा अधिक होईल अशा दिनांकापासून या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असेल :

परंतु, उक्त वर्षाच्या १ एप्रिल या दिवसापासून गणना केली असता ज्याच्या खरेदीची किंवा विक्रीची उलाढाल अशा मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल असा व्यापारी, उक्त वर्षाच्या १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या कालावधीत झालेल्या अशा विक्रीच्या बाबतीत कर भरण्यास पात्र असणार नाही.

(३) या अधिनियमाखाली कर भरण्यास पात्र होतो असा प्रत्येक व्यापारी, त्याचे नोंदणीपत्र रीतसर रद्द होईपर्यंत याप्रमाणे पात्र असण्याचे चालू राहील आणि प्रमाणपत्र याप्रमाणे रद्द करण्यात आल्यावर, आधीच बसवलेला किंवा बसवण्यायोग्य असलेला सोडून अन्य कर भरण्याचे, त्याचे दायित्व हे, त्याच्या सर्व खरेदीची उलाढाल किंवा सर्व विक्रीची उलाढाल पुन्हा प्रथम पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक होईपर्यंत समाप्त राहील.

परंतु, वर उल्लेखिल्याप्रमाणे, ज्या वर्षात व्यापारी कर भरण्यास पात्र असण्याचे बंद झाले असेल त्याच वर्षात तो पुन्हा कर भरण्यास पात्र झाला तर, कराच्या दायित्व समाप्तीच्या तारखेस सुरू होणाऱ्या कालावधीत आणि ज्यावेळी त्याच्या सर्व खरेदीची किंवा सर्व विक्रीची उलाढाल अशा मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही, त्या वेळेपर्यंतच्या कालावधीत, त्या व्यापाऱ्याकडून जे खरेदीचे आणि विक्रीचे व्यवहार होतील त्या बाबतीत त्याला कर द्यावा लागणार नाही.

व्यापाऱ्यांचे दायित्व.

४. या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, नियत दिवशी किंवा त्या दिवसानंतर अंमलबजावणी सुरू केलेले किंवा चालू ठेवलेले कार्यकंत्राट मग असे कंत्राट नियत दिवसापूर्वी किंवा त्या दिवसानंतर करण्यात आलेले असो वा नसो—त्याच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या बाबतीत केलेल्या विक्रीच्या उलाढालीवर कर बसवण्यायोग्य असेल.

व्यापाऱ्याकडून देय असलेला कर.

५. या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यापाऱ्याला, विक्रीच्या उलाढालीवर या अधिनियमाच्या तरतुदींनुसार बसवण्यायोग्य कर द्यावा लागेल.

विक्रीच्या उलाढालीच्या रकमेची विभागणी करण्याची सुविधा.

[1][५अ. कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

(१) या अधिनियमाखाली नोंदलेल्या पोटकंत्राटदाराकडे कार्यकंत्राटाची अंमलबजावणी (पूर्णतः किंवा अंशतः) सोपविणारा कंत्राटदार, त्याच्या एकूण कंत्राटमूल्यामधून, अशा पोटकंत्राटदारामार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या कार्यकंत्राटाचे मूल्य वजा करील. मात्र अशा पोटकंत्राटदाराकडून विहित नमुन्यात स्वाक्षरित केलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले पाहिजे.

---

१. सन १९९१ चा अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ अन्वये कलम ५ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(२) कलम ६अ अन्वये परवानगी देण्यात आलेल्या कंत्राटदाराने ज्या पोटकंत्राटदाराकडे कंत्राटदाराची अंमलबजावणी (पूर्णत: किंवा अंशत:) सोपविलेली असेल तो पोटकंत्राटदार, त्याच्या एकूण कंत्राटमूल्यामधून, त्याने अंमलबजावणी केलेल्या अशा कार्यकंत्राटाचे मूल्य वजा करील. मात्र अशा कंत्राटदाराने स्वाक्षरीत केलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले पाहिजे.

आणि तदनुसार परंतु, कलम ७ च्या तरतुदींच्या अधीन राहून, असे कंत्राटमूल्य दर्शविणाऱ्या विक्रीच्या उलाढालीच्या रकमेवर अशा कंत्राटदाराकडून किंवा यथास्थिति, पोटकंत्राटदाराकडून कोणताही कर देय असणार नाही.]

६. [१][(१) (अ) अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या मालाव्यतिरिक्त इतर मालाच्या बाबतीत, विक्रीच्या उलाढालीवर, अशा उलाढालीच्या रकमेमधून पुढील रक्कम वजा केल्यानंतर खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी कर बसवण्यात येईल— कर बसवणे.

(अ) मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेल्या व्यापाऱ्याकडून खरेदी करण्यात आलेल्या व ज्या स्वरूपात माल खरेदी करण्यात आला त्याच स्वरूपात किंवा ज्यामुळे तो माल ही कोणतीही निर्मिती ठरेल किंवा ज्यामुळे त्याची परिणती कोणत्याही निर्मितीत होईल अशी कोणतीही प्रक्रिया त्यावर न करता विक्री करण्यात आलेल्या घोषित मालाच्या बाबतीत, विक्रीच्या उलाढालीची रक्कम,

(ब) मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या अनुसूची-अ मध्ये समाविष्ट केलेल्या मालाच्या बाबतीत त्याच्या विक्रीच्या उलाढालीची रक्कम,

(क) मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ४१ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचने-अन्वये ज्या मालाच्या बाबतीत संपूर्ण कर भरण्यामधून बिनशर्त सूट देण्यात आली असेल त्या मालाच्या विक्रीच्या उलाढालीची रक्कम.

(ड) कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीत घोषित मालाव्यतिरिक्त ज्या इतर मालाच्या बाबतीत, मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आले असेल आणि असे हस्तांतरण [२][तो माल ज्या स्वरूपात खरेदी करण्यात आला असेल त्या स्वरूपातच किंवा माल ज्या स्वरूपात खरेदी करण्यात आला होता त्या स्वरूपात आलेला इतर कोणताही बदल हा, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्रक्रियेचा किंवा पद्धतीचा वापर करून करण्यात आला असेल त्याबाबतीत अशा बदलेल्या स्वरूपात करण्यात आले असेल] त्याबाबतीत अशा मालाच्या खरेदीच्या उलाढालीची रक्कम, मात्र—

(एक) अशी खरेदी, मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली ज्याची नोंदणी केलेली आहे व अशा खरेदीच्या दिनांकास ज्याचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आहे अशा व्यापाऱ्याकडून करण्यात आलेली असेल,

(दोन) अशी खरेदी, मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली नोंदणी न केलेल्या व्यक्तीकडून करण्यात आलेली असेल आणि त्या खरेदीवर त्या अधिनियमाखाली खरेदीकर भरण्यात आलेला असेल,

(ब) हा कर पुढील दरांनी बसवण्यात येईल :—

(एक) घोषित मालाच्या बाबतीत, कराचा दर, अशा मालाच्या विक्रीच्या उलाढालीच्या रकमेवर एका रुपयास चार पैसे,

(दोन) घोषित मालाव्यतिरिक्त इतर मालाच्या बाबतीत, कराचा दर, अशा मालाच्या विक्रीच्या उलाढालीच्या रकमेवर एका रुपयास दहा पैसे.

---

१. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ कलम १० पोट-कलम (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) (अ) अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या मालाच्या बाबतीत, विक्रीच्या उलाढालीच्या रकमेवर अशा उलाढालीच्या रकमेमधून पुढील रक्कम वजा केल्यानंतर, खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी कर बसविण्यात येईल.—

(अ) मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेल्या व्यापाऱ्याकडून खरेदी करण्यात आलेल्या व ज्या स्वरुपात माल खरेदी करण्यात आला असेल त्याच स्वरुपात किंवा ज्यामुळे तो माल ही कोणतीही निर्मिती ठरेल किंवा ज्यामुळे त्याची परिणती कोणत्याही निर्मितीत होईल अशी कोणतीही प्रक्रिया त्यावर न करता विक्री करण्यात आलेल्या घोषित मालाच्या विक्रीच्या उलाढालीची रक्कम,

(ब) मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या अनुसूची "अ" मध्ये समाविष्ट केलेल्या मालाच्या बाबतीत विक्रीच्या उलाढालीची रक्कम;

(क) मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ४१ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचने अन्वये ज्या मालाच्या बाबतीत संपूर्ण कर भरण्यामधून बिनशर्त सूट देण्यात आली असेल त्या मालाच्या विक्रीच्या उलाढालीची रक्कम;

(ड) कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीत, घोषित मालाव्यतिरिक्त ज्या इतर मालाच्याबाबतीत मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आले असेल आणि असे हस्तांतरण [1][एकतर तो माल ज्या स्वरुपात खरेदी करण्यात आला असेल त्या स्वरुपातच किंवा माल ज्या स्वरुपात खरेदी करण्यात आला होता त्या स्वरुपात झालेला इतर कोणताही बदल हा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्रक्रियेचा किंवा पद्धतीचा वापर करून करण्यात आला असेल त्याबाबतीत अशा बदललेल्या स्वरुपात करण्यात आले असेल] त्याबाबतीत अशा मालाच्या खरेदीच्या उलाढालीची रक्कम;

माल—

(एक) अशी खरेदी, मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली ज्याची नोंदणी करण्यात आली आसेल व अशा खरेदीच्या दिनांकास ज्याचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आहे अशा व्यापाऱ्याकडून करण्यास आलेली असेल,

(दोन) अशी खरेदी मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली नोंदणी न केलेल्या व्यक्तीकडून करण्यात आली असेल व त्या खरेदीवर त्या आधिनियमाखाली खरेदीकर भरण्यात आलेला असेल.

(ब) हा कर पुढील दरांनी बसवण्यात येईल :—

(एक) घोषित मालाच्या बाबतीत, कराचा दर, अशा मालाच्या विक्रीच्या उलाढालीच्या रकमेवर एक रुपयास चार पैसे ;

(दोन) घोषित मालाव्यतिरिक्त त्याच स्वरूपात विक्री करण्यात आलेल्या इतर मालाच्या बाबतीत, हा कराचा दर, मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये अशा मालासमोर नमूद केलेला कराचा दर किंवा यथास्थिति, त्या अधिनियमाच्या कलम ४१ अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यात आली असल्यास त्या अधिसूचनेअन्वये देय असणारा कराचा दर ;

---

१. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम १० पोटकलम (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) उप-खंड (एक) व (दोन) मध्ये समाविष्ट केलेल्या मालाव्यतिरिक्त इतर मालाच्या बाबतीत, राज्य शासन, वेळोवेळी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक मालाच्या बाबतीत, विनिर्दिष्ट करील त्यानुसार, अशा मालाच्या विक्रीच्या उलाढालीच्या रकमेवर एका रुपयाला जास्तीत जास्त चाळीस पैसे एवढा दर]

(३) घोषित केलेल्या मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर एकापेक्षा अधिक टप्प्यामध्ये कर वसुली करण्यात येणार नाही या केंद्रीय विक्रीकर अधिनियम १९५६ याच्या कलम १५ मध्ये अंतर्भूत असलेल्या निर्बंधाच्या अनुपालनाची निश्चिती करून घेण्यासाठी याद्वारे अशी तरतूद करण्यात येत आहे की, जर मुंबई विक्रीकर अधिनियमान्वये किंवा या अधिनियमान्वये, अशा मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर कोणताही कर वसुलीयोग्य असेल तर या अधिनियमान्वये तशाच स्वरूपामधील अशा मालाच्या नंतरच्या विक्रीवर आणखी कर वसूल करण्यात येणार नाही आणि तदनुसार व्यापाऱ्याच्या विक्रीच्या करयोग्य उलाढालीचा निर्णय करण्याच्या प्रयोजना-करिता, त्याच्या विक्रीच्या एकूण उलाढालीमधून अशा घोषित मालाची ज्यावर अगोदरच्या कोणत्याही टप्प्यात कर वसुलीयोग्य झालेला आहे अशी विक्री वजा करण्यात येईल.

[१][" ६अ [२][(१) आयुक्ताला, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तींच्या अधीन राहून, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याला या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये त्याच्याकडून देय असणाऱ्या कराच्या ऐवजी, त्याच्या विकल्पानुसार, राज्य शासन, वेळोवेळी, कार्यकंत्राटाच्या अंमल-बजावणीत अंतर्भूत असलेल्या मालाचे स्वरूप लक्षात केऊन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्यानुसार, कार्यकंत्राटाच्या कंत्राटमूल्याच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक नसेल, एवढी ठोक रक्कम आपसमेळाद्वारे भरण्याची परवानगी देता येईल ; **कराचा आपसमेळ.**

(२) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेली परवानगी ही, अशी परवानगी देण्यात आल्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या आणि अशी परवानगी पोट-कलम (६) अन्वये ज्या तारखेला रद्द करण्यात आली असेल त्या तारखेला संपणाऱ्या कालावधीत करण्यात येणाऱ्या सर्व कंत्राटांच्या संबंधात परिणामकारक असेल ;]

(३) * * * * *[३]

(४) या कलमान्वये परवानगी देण्यात आलेला व्यापारी, ज्या व्यक्तीसाठी कार्यकंत्राट करण्यात आले असेल किंवा करण्यात येत असेल त्या व्यक्तीकडून, या कलमान्वये, आपसमेळाद्वारे त्याने भरलेल्या किंवा त्याच्याकडून देय असलेल्या ठोक रकमेपेक्षा कोणतीही अधिक रक्कम वसूल करणार नाही.

(५) कोणत्याही व्यापाऱ्याने पोट-कलम (४) चे उल्लंघन करून कोणतीही अधिक रक्कम वसूल केली असेल व ती शासकीय कोषागारात भरली नसेल तर, ती रक्कम देण्याचे दायित्व त्याच्यावर राहील आणि त्याने ती रक्कम शासकीय कोषागारात भरली असेल तर त्याने भरलेल्या अशा जादा रकमेच्या संबंधात त्याला कोणताही परतावा देण्यात येणार नाही ; आणि पोट-कलम (४) चे उल्लंघन करून वसूल करण्यात आलेली अशी जादा रक्कम, या अधिनियमान्वये गोळा करण्यात आलेला कर असल्याचे मानण्यात येईल ; आणि अशी जादा रक्कम राज्य शासनाकडे समपहृत

---

१. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ५ अन्वये मूळ मजकूरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६३(अ) द्वारे पोट-कलमे (१) व (२) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६३(ब) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

केली जाण्यास पात्र ठरेल आणि कलम ३७ मध्ये घालून देण्यात आलेली कार्यपद्धती व मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ३८ ची पोट-कलमे (४), (६) आणि (६-अ) यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, असे कोणतेही समाहरण केले असल्यास, त्यास लागू होतील.

[1][(६) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेली परवानगी जर एखाद्या व्यापाऱ्याने,—

(अ) त्याला देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यासाठी अर्ज केला असेल तर, किंवा

(ब) ज्यांच्या अधीन राहून अशी परवानगी देण्यात आली असेल अशा कोणत्याही नियमांचा किंवा शर्तीचा भंग केला असेल तर ;

आयुक्ताला अशी परवानगी रद्द करता येईल ;]

प्रकर्ता व अभिकर्ता यांचे संयुक्त व पृथक दायित्व. ७. (१) कोणत्याही करारात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, कंत्राटदार, त्याला देण्यात आलेल्या कार्य-कंत्राटांची अंमलबजावणी उप-कंत्राटदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अन्यथा करील त्याबाबतीत, कंत्राटदार व उप-कंत्राटदार म्हणून ज्या व्यक्तीने प्रत्यक्षात कार्य-कंत्राटाची किंवा त्याच्या भागाची अंमलबजावणी केली असेल ती व्यक्ती, यांमधील संबंध प्रकर्ता व अभिकर्ता यांच्यामधील संबंधाप्रमाणे असल्याचे मानण्यात येईल.

(२) अशा अभिकर्त्याने प्रकर्त्याच्या वतीने अशा कार्यकंत्राटाची अंमलबजावणी केली असेल व त्यांच्यापैकी प्रत्येकजण किंवा दोघेही या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असतील अशा बाबतीत या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी प्रकर्ता व अभिकर्ता हे, अशा कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मत्तेच्या हस्तांतरणासंबंधातील कर संयुक्तपणे व पृथकरणे भरण्यास पात्र असतील.

(३) अभिकर्त्याने विक्रीच्या उलाढालीवर कर भरला असल्याबाबत प्रकर्त्याने आयुक्ताची खात्री पटवून दिली तर, अभिकर्त्याने ज्या विक्रीच्या उलाढालीवर कर भरला असेल त्याच विक्रीच्या उलाढालीवर परत कर भरण्यास प्रकर्ता पात्र ठरणार नाही.

(४) अभिकर्ता या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ज्या विक्रीच्या उलाढालीवर कर भरण्यास पात्र असेल त्या उलाढालीवर त्याच्या प्रकर्त्याने प्रत्यक्षात कर भरला असल्याबाबत त्या अभिकर्त्याने आयुक्ताची खात्री पटवून दिली तर, प्रकर्त्याने ज्या विक्रीच्या उलाढालीवर कर भरला असेल त्याच विक्रीच्या उलाढालीवर परत कर भरण्यास तो अभिकर्ता पात्र ठरणार नाही.

(५) विहित करण्यात येईल अशा तपशीलाचा समावेश असलेले प्रमाणपत्र सादर केल्याखेरीज प्रकर्ता किंवा अभिकर्ता यांना पोट-कलम (३) किंवा (४) अन्वये कर भरण्यामधून कोणतीही वजावट देण्यात येणार नाही.

## प्रकरण तीन

### नोंदणी

नोंदणी. ८. (१) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असताना, अशा कोणताही व्यापारी, त्याच्याकडे या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे वैध नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय, कोणत्याही कार्यकंत्राटाची अंमलबजावणी करू किंवा चालू ठेवू शकणार नाही :

परंतु जर व्यापाऱ्याने विहित मुदतीमध्ये अशा नोंदणीसाठी अर्ज केला असेल तर, त्याने कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करणे किंवा करण्याचे चालू ठेवणे कायदेशीर ठरेल.

---

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६३ (क) द्वारे मूळ पोट-कलम (६) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(२) नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे असा प्रत्येक व्यापारी विहित करण्यात आले असेल अशा पद्धतीने आणि अशा प्राधिकरणाकडे अर्ज करील.

(३) प्राधिकरणाने, स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, नोंदणीसाठी केलेला अर्ज नियमानुसार आहे अशी त्याची खात्री पटली तर, ते अर्जदाराची नोंदणी करील आणि विहित नमुन्यातील नोंदणीचे प्रमाणपत्र त्याला देईल.

(४) प्राधिकरण या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार देण्यात आलेली किंवा अन्यथा मागवलेली किंवा प्राप्त झालेली कोणतीही माहिती विचारात घेतल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र वेळोवेळी सुधारू शकेल.

(५) जर या कलमानुसार एखाद्या व्यक्तीच्या अर्जावरून तिची व्यापारी म्हणून नोंदणी करण्यात आली असता मागाहून असे आढळले की, तिची या कलमाच्या तरतुदींनुसार नोंदणी करावयास नको होती, तर ती कलम ३ अन्वये कर भरणा करण्यास पात्र नसली तरी,* तिचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आले असेल त्या तारखेपासून, ते रद्द होईपर्यंत तिने केलेल्या विक्रीव्यवहारावरील कर भरण्यास ती पात्र राहील.

(६) नोंदलेल्या व्यापाऱ्याने कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करण्याचे काम बंद केले असेल किंवा हस्तांतरित केले असेल किंवा अन्यथा निकालात काढले असेल किंवा नोंदलेल्या व्यापाऱ्याच्या विक्री किंवा खरेदी व्यवहारांची उलाढाल एखाद्या वर्षी कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक झाली नसेल आणि व्यापाऱ्याने त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी विहित पद्धतीने अर्ज केला असेल तर त्याबाबत विहित प्राधिकरण नियमानुसार ते ठरवील अशा तारखेपासून नोंदणी रद्द करील.

(७) एखाद्या नोंदलेल्या व्यापाऱ्याने कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करण्याचे काम बंद केले असेल, हस्तांतरित केले असेल किंवा अन्यथा निकालात काढले असेल आणि नोंदणीचे प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी पोट-कलम (६) अन्वये अर्ज करण्यास तो व्यापारी चुकला अशी आयुक्तांची खात्री झाली असेल तरच व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयुक्त नोंदलेल्या व्यापाऱ्याने उक्त काम बंद केल्याची, हस्तांतरित केल्याची, अन्यथा, यथास्थिति, निकालात काढल्याची तारीख म्हणून जी तारीख ठरवील त्या तारखेपासून नोंदणी रद्द करू शकेल;

परंतु, व्यापाऱ्याच्या अर्जावरून किंवा अन्यथा नोंदणी प्रमाणपत्र रद्द झाल्यामुळे रद्द करण्याच्या तारखेपर्यंतच्या कोणत्याही कालावधीकरिता देय असलेला कार (कोणतेही व्याज किंवा शास्ती यांसह) भरण्याच्या व्यापाऱ्याच्या दायित्वावर परिणाम होणार नाही, मग असा कर (कोणतेही व्याज किंवा शास्ती यांसह) रद्द करण्याच्या तारखेपूर्वी निर्धारित केलेला परंतु चुकता करण्याचा राहिलेला असो किंवा नंतर निर्धारित केलेला असो.

## प्रकरण चार

### मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी लागू असणे

९. (१) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या आणि त्या खाली केलेल्या नियमांच्या अधीन मुंबई
राहून, ज्या प्राधिकरणांना मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली कोणत्याही कराची आकारणी करणे, विक्री कर
फेर आकारणी करणे, वसुली करणे आणि सक्तीने वसुली करणे याकरिता अधिकार प्रदान केलेले अधिनियमा-
आहेत अशी प्राधिकरणे या अधिनियमाखाली व्यापाऱ्यांकडून प्रदेय असलेला कोणताही कर हा खालील
जणू काही मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली प्रदेय असलेला कर व्याज किंवा शास्ती असावा त्याप्रमाणे त्यांची प्राधिकरणांना
आकारणी, फेर आकारणी, वसुली आणि सक्तीने वसुली करतील आणि त्यांना मुंबई विक्रीकर या अधि-
अधिनियमाखाली जे अधिकार आहेत ते सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार त्यांना या प्रयोज- नियमाचे
नार्थ वापरता येतील आणि विवरणपत्रे, आकारणी, फेरआकारणी, दुरुस्ती, वसुली, समपहरण कराची
अधिनियमानुसार कर भरण्यास दायी असलेल्या व्यापाऱ्याच्या हस्तांतरितीची नोंदणी, कर भरण्याचे आकारणी,

फेर आकारणी इत्यादि करण्यासाठी अधिकार प्रदान.

व्यापाऱ्याचे दायित्व अशा व्यापाऱ्याच्या हस्तांतरितीवर किंवा उत्तराधिकाऱ्यावर लादणे, कोणत्याही भागीदारी संस्थेवर किंवा हिंदू अविभक्त कुटुंबावर असलेले कर देण्याचे दायित्व अशा भागीदारी संस्थेचे विसर्जन झाल्यामुळे किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाचे विभाजन झाल्यामुळे हस्तांतरित होणे, कराची वसुली करण्याची विशेष पद्धती, अपीले, पुनरीक्षणे, निर्देशने, परतावे दंड, शास्ती, व्याज आकारणे किंवा भरणे, अपराध आपसात मिटवणे, व्यापाऱ्याने सादर केलेली कागदपत्रे गोपनीय म्हणून समजणे यासंबंधी मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह तद्नुसार लागू होतील.

(२) मुंबई विक्रीकर अधिनियमातील अपराध व शास्ती यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व तरतुदी (एखाद्या अपराधाबद्दल खटला दाखल करण्याऐवजी केलेली शास्ती किंवा एखाद्या अपराधाबद्दल असलेली शास्ती किंवा शिक्षा यांच्या व्यतिरिक्त असलेली जादा शास्ती यांच्या बाबतीतील तरतुदींसह) जणू काही या अधिनियमाखाली प्रदेय असलेला कर हा मुंबई विक्रीकर अधिनियमाखालील प्रदेय कर असावा त्याप्रमाणे या अधिनियमान्वये ज्याची वसुली करणे आवश्यक आहे अशा कराची आकारणी, फेरआकारणी, वसुली व सक्तीची कर-वसुली यांच्या बाबतीत अथवा अशी आकारणी, फेरआकारणी, वसुली किंवा सक्तीची वसुली यांच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

## प्रकरण पाच

### संकीर्ण आणि नियम

विवक्षित विक्री ही करासाठी पात्र नसणे.

१०. जर कोणत्याही मालाची कोणतीही विक्री—

(अ) (एक) राज्याबाहेर ; किंवा

(दोन) भारताच्या राज्यक्षेत्रात माल आयात करताना किंवा अशा राज्यक्षेत्राबाहेर माल निर्यात करताना ; किंवा

(ब) आंतरराज्य व्यापार अथवा वाणिज्य व्यवहार करताना.

करण्यात आली असेल तर अशा विक्रीवर, या अधिनियमातील किंवा त्या अन्वये केलेल्या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कर बसविण्यात येतो किंवा बसवण्यास प्राधिकृत केले आहे असे मानले जाणार नाही आणि या अधिनियमाच्या तरतुदी व उक्त नियम तद्नुसार वाचले जातील व त्यांचा अर्थ लावला जाईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखादी विक्री—

(एक) राज्याबाहेर किंवा

(दोन) भारताच्या राज्यक्षेत्रात माल आयात करताना किंवा अशा राज्यक्षेत्राबाहेर माल निर्यात करताना, किंवा

(तीन) आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार करताना. १९५६ चा

झाली आहे किंवा काय हे केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ याची कलमे ३, ४ व ५ मध्ये ७४.

विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वानुसार ठरविण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

११. (१) राज्य शासनास सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील.

(२) विशेषत: व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, नियम विहित करण्यासाठी या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे आवश्यक असलेल्या किंवा मान्यता असलेल्या सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तरतूद करण्याकरिता असे नियम करण्यात येतील.

(३) कोणतेही नियम करताना राज्य शासन असा निदेश देऊ शकेल की, नियमांचा भंग झाल्यास तो दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास आणि असा अपराध चालू राहणारा असेल तर, असा अपराध करण्याचे चालू असेल त्या कालावधीत प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(४) या कलमाअन्वये करण्यात आलेले नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील :

परंतु, त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाल्यास, त्याला या कलमान्वये करण्यात यावयाच्या कोणत्याही नियमाच्या बाबतीत पूर्वप्रसिद्धीची ही शर्त काढून टाकता येईल.

(५) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरफार करण्याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील, तर तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति तो नियम अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचे अधिकार.

१२. जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात अडचण निर्माण झाली तर, अशी अडचण दूर करण्यासाठी राज्य शासनाला राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशा या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील :

परंतु, असा आदेश हा अधिनियम राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर काढता येणार नाही.

## प्रकरण सहा

### संक्रमणात्मक आणि विशेष तरतुदी

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याचे निरसन.

१९८५ चा महा. १९.

१३. महाराष्ट्र कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "निरसित अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा निरसित झाला असल्याचे मानण्यात येईल.

काही विवक्षित कार्यकंत्राटाच्या बाबतीत कर न बसवणे.

१४. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, १ ऑक्टोबर १९८६ पासून प्रारंभ होणाऱ्या आणि १७ मार्च १९८८ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये निरसित अधिनियमाच्या अनुसूचीतील नोंद १८ मध्ये समाविष्ट केलेल्या कार्य-कंत्राटाच्या बाबतीतील विक्रीच्या उलाढालीवर या अधिनियमान्वये कर बसविता येणार नाही आणि तो गोळा करता येणार नाही.

**निरसित अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र नसलेली व्यक्ती विनिर्दिष्ट कालावधीमध्ये कर भरण्यास पात्र असणार नाही.**

१५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी १ ऑक्टोबर, १९८६ पासून प्रारंभ होणाऱ्या आणि राजपत्रात हा अधिनियम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वी संपणाऱ्या कालावधीत कर (यात यापुढे ज्याचा निर्देश "विनिर्दिष्ट कालावधी" असा करण्यात आला आहे) जी कोणतीही व्यक्ती निरसित अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र नसेल ती, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये कोणताही कर भरण्यास पात्र असणार नाही आणि त्यानुसार तिच्यावर कर बसविण्यात येणार नाही आणि अशा व्यक्तीकडून तो गोळा करण्यात येणार नाही.

**निरसित अधिनियमान्वये भरलेला कर किंवा जादा कर परत करणे.**

१६. निरसित अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याने निरसित अधिनियमान्वये कोणतीही रक्कम कर म्हणून शासकीय कोषागारात भरली आहे, परंतु तो या अधिनियमाच्या तरतुदीनुसार विनिर्दिष्ट कालावधीकरिता किंवा त्यातील कोणत्याही भागाकरिता कोणताही कर किंवा भरावयाच्या रकमेपेक्षा अधिक होणारा कर भरण्यास पात्र नाहीत अशी आयुक्तांची खात्री पटली तर आयुक्त अशा व्यापाऱ्याकडून विनिर्दिष्ट कालावधीकरिता विहित नमुन्यात एकत्रीकृत नवीन विवरण दाखल करण्यात आल्यावर आणि लवकरात लवकर त्याचे निर्धारण केल्यानंतर निरसित अधिनियमान्वये त्याच्याकडून भरण्यात आलेली कराची रक्कम किंवा कराची जादा रक्कम परत करण्याचा आदेश देईल:

परंतु नोंदणीकृत व्यापाऱ्याने जिच्याकडे मालातील मालमत्ता हस्तांतरित केली असेल अशा व्यक्तीकडून ती रक्कम स्वतंत्रपणे कराच्या रूपाने वसूल करण्यात आली असेल तर अशी वसुली केलेल्या रकमेच्या संबंधात परतावा मंजूर करण्यात येणार नाही आणि अशी रक्कम राज्य शासनाकडे सरकारजमा करण्यात येईल आणि अशा प्रकारे रक्कम सरकारजमा करण्यात आल्यावर मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ३८ पोट-कलम (६) आणि (६अ) च्या तरतुदी त्या अधिनियमाखाली सरकारजमा करण्यात आलेल्या कराच्या रकमेच्या बाबतीत त्या जशा लागू होतात तशाच परंतु योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

**नवीन एकत्रीकृत विवरण दाखल करणे.**

१७. निरसित झालेल्या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेला व्यापारी, त्या निरसित अधिनियमान्वये ज्या विनिर्दिष्ट मुदतीकरिता किंवा तिच्या कोणताही भागाकरिता त्याने नोंदणी प्रमाणपत्र धारण केले होते त्या मुदतीकरिता किंवा तिच्या कोणत्याही भागाकरिता, विहित करण्यात येईल अशा मुदतीत, विहित करण्यात येईल अशा रीतीने व विहित करण्यात येईल अशा तपशीलासह नवीन एकत्रीकृत विवरण दाखल करील. विशेषतः या विवरणात देय कराची रक्कम, निरसित झालेल्या अधिनियमान्वये भरणा करण्यात आलेली कराची रक्कम व त्याच्याकडून देय असलेली कराची रक्कम किंवा यथास्थिति, जादा भरणा करण्यात आलेली कराची रक्कम विनिर्दिष्ट करण्यात येईल. तरीही कराची कोणतीही शिल्लक रकम देय राहिल्यास ती, विवरण सादर करण्यापूर्वी भरण्यात येईल व जादा भरणा करण्यात आलेली कराची कोणतीही रक्कम, आकारणीनंतर, कलम १६ मध्ये घालून देण्यात आलेल्या रीतीने परत करण्यात येईल.

**आकारणी करण्याकरिता मुदत मर्यादेची संगणना.**

१८. निरसित झालेल्या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेल्या व्यापाऱ्याने कलम १७ च्या तरतुदीनुसार नवीन एकत्रीकृत विवरण सादर केले असेल त्याबाबतीत त्या विनिर्दिष्ट मुदतीकरिता किंवा तिच्या कोणत्याही भागाकरिता आकारणी पूर्ण करण्याच्या ३ वर्षाच्या मुदत मर्यादेची संगणना, असे विवरण दाखल करण्याकरिता विहित करण्यात आलेला दिनांक ज्या वित्तीय वर्षात येतो त्या वर्षाच्या अखेरीपासून करण्यात येईल.

**आकारणी आदेश.**

१९. या अधिनियमात किंवा मुंबई विक्रीकर अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाच्या तरतुदीनुसार अशा विनिर्दिष्ट मुदतीकरिता कर भरण्यास जो पात्र असेल किंवा

पात्र झाला असेल अशा व्यापाऱ्याच्या बाबतीत त्या विनिर्दिष्ट मुदतीकरता किंवा तिच्या कोणत्याही भागाकरिता आकारणीचा फक्त एकच आदेश काढण्यात येईल.

२०. आयुक्त, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन राहून, या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्यास त्याच्या विकल्पानुसार, त्या विनिर्दिष्ट मुदतीच्या संबंधात त्या व्यापाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये देय असलेल्या कराच्या रकमेऐवजी, त्याने केलेल्या कार्यकंत्राटाच्या एकूण मूल्याच्या चार टक्के दराने आपसमेळाद्वारे ठोक रक्कम देण्याची परवानगी देऊ शकेल :

विनिर्दिष्ट मुदतीकरता कराचा आपसमेळ.

परंतु, नवीन एकत्रिकृत विवरण दाखल करण्याकरिता विहित करण्यात आलेली मुदत समाप्त होण्यापूर्वी अशा विकल्पाचा वापर करणाऱ्या व्यापाऱ्याने असे विवरण दाखल करण्याची आवश्यकता असणार नाही.

२१. विनिर्दिष्ट मुदतीत कोणत्याही दिवशी, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये कर देण्यास पात्र झालेल्या व त्या मुदतीनंतर असा कर देण्यास पात्र असण्याचे चालू राहिलेल्या किंवा चालू न राहिलेल्या एखाद्या व्यापाऱ्यास या निरसित अधिनियमान्वये देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र,—मग ते अंमलात असो वा नसो—जणू काही या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये देण्यात आले असल्याप्रमाणे वैध असल्याचे मानण्यात येईल व तो व्यापारी असा कर देण्यास पात्र झाल्याच्या दिनांकापासून त्या निरसित अधिनियमान्वये प्रमाणपत्र रद्द होईतोपर्यंत किंवा यथास्थिति या अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रमाणपत्र रद्द होईतोपर्यंत ते अंमलात राहील.

कर-नोंदणी प्रमाणपत्राची वैधता व परिणामकारकता.

२२. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, तिने या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात, अशी केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली गोष्ट, हा अधिनियम पुनरधिनियमित केल्यामुळे अपराध ठरत असेल व अन्यथा त्या निरसित अधिनियमान्वये तो अपराध ठरत नसेल तर, अशा कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविली जाण्यास पात्र होणार नाही किंवा अशा केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात कोणतीही व्यक्ती, हा अधिनियम राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये तिच्यावर लादण्यात आला असता अशा द्रव्यदंडापेक्षा अधिक द्रव्यदंडास पात्र होणार नाही.

विवक्षित परिस्थितीत दोषसिद्धीसाठी व्यक्ती पात्र न ठरणे.

## [1][अनुसूची

[कलम २ (१) (म-१) पहा]

| अनुक्रमांक (१) | मालाचे वर्णन (२) |
|---|---|
| १ | गुंडाळी झडपा (रोलिंग शटर) किंवा घडीची दारे (कोलॅप्सिबल गेट) |
| २ | मातीची कौले व या अनुसूचीच्या नोंद क्रमांक ३ खाली आलेल्या लादघा यांव्यतिरिक्त जमिनीवर, भिंतीवर किंवा छताला बसवायाच्या लादघा. |
| ३ | संगमरवर किंवा ग्रॅनाईट यांपासून बनवलेल्या, जमिनीवर किंवा भिंतीवर बसवावयाच्या सर्व प्रकारच्या लाद्या. |
| ४ | संगमरवर, ग्रॅनाईट आणि संगमरवर किंवा ग्रॅनाईटपासून बनविलेल्या (परंतु नोंद क्रमांक ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूंव्यतिरिक्त) वस्तू. |
| ५ | (अ) वीजनिर्मिती, विजेचे पारेषण, वितरण किंवा विजेच्या वापराच्या संबंधात वापरल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या तारा व केबल्स, होल्डर्स, प्लग, स्विचेस, केसिंग्ज, कॅपिंग्ज, रिपर्स, बेण्डस, जंक्शन बॉक्सेस, मीटरबोर्डस, स्विचबोर्डस, इलेक्ट्रिकल अर्दनवेअर व पोर्सिलिनवेअर यांसारख्या (परंतु या अनुसूचीत इतरत्र विनिर्दिष्ट केलेल्या वस्तुंव्यतिरिक्त) सर्व प्रकारच्या विजेच्या वस्तू.<br>(ब) जनित्र व ट्रान्सफॉमर्स व त्यापैकी कशाचेही घटक, सुटे भाग व उपसाधने.<br>(क) सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक लॅम्प शेडस, स्टॅण्ड्स, फिक्श्चर्स, फिटिंग्ज, ब्रॅकेटस्, शॅडेलियर्स व इलेक्ट्रिकल बल्ब बरोबर किंवा त्याशिवाय विकण्यात येणारी इलेक्ट्रिकल बल्बची इतर उपसाधने.<br>(ड) या अनुसूचीत अन्य कोणत्याही नोंदीखाली विनिर्दिष्ट केलेली यंत्रसामुग्री व तिचे घटक, सुटे विभाग व उपसाधने वगळता विजेच्या किंवा अन्य कोणत्याही शक्तीच्या सहाय्याने चालविण्यात येणारी यंत्रसामग्री व तिचे घटक, सुटे भाग व उपसाधने.<br>(ई) यंत्रसामग्रीची हत्यारे. |
| ६ | ॲक्रिलिक व प्लास्टिक इमल्शन पेन्टस (ॲक्रिलिक व प्लास्टिक इमल्शन रंग) व सर्व प्रकारची लाखरोगणे (लॅकर्स). |
| ७ | सर्व प्रकारची प्रसाधनगृहाची सामग्री व त्यांच्या जोडण्या. |
| ८ | नळमार्ग व कन्डयूट्ससाठी वापरण्यात येणारे सर्व प्रकारचे पाईप्स. |
| ९ | (अ) या अनुसूचीच्या नोंद क्रमांक ६ मध्ये विनिर्दिष्ट केले असतील अशा सर्व रंगाव्यतिरिक्त, परंतु डिसटेंपर्स, सिमेंट कलर्स, किंवा पेंट्स, पावडर पेंट्स, स्टिफ पेस्ट पेंट्स, एनॅमल्स व लिक्विड पेंटस, यांसह सर्व प्रकारचे पेंट्स, मग ते वापरासाठी सिद्ध केलेले असोत वा नसोत.<br>(ब) वॉर्निशेस, फ्रेंच पॉलिश, व्हेजिटेबल टर्पेन्टाईन्स, पेंट रिमूव्हर्स व सर्व प्रकारचे स्टेनर्स |
| १० | (अ) बॉयलर्स, ओव्हन्स, गीझर्स यांसारखी घरगुती व वाणिज्यिक वापराची उपकरणे व त्यापैकी कोणत्याही उपकरणाचे घटक, भाग व उपसाधने.<br>(ब) सर्व प्रकारचे विजेवर चालणारे पंखे, एअर सर्क्यूलेटर्स व एक्झॉस्ट फॅन्स व त्याचे, घटक, सुटे भाग व उपसाधने. |

१. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ६ अन्वये ही अनुसूची, दाखल करण्यात आली.

अनुसूची—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| ११ | संयंत्र व यंत्रसामग्री. |
| १२ | (फोर्क-लिफ्ट ट्रक्स व प्लॅटफॉर्म ट्रक्स यांसह) क्रेन्स व हॉईस्ट व त्याचे घटक, सुटे भाग व उपसाधने.) |
| १३ | दरवाजे, खिडक्या, चौकटी, ग्रिल्स, फिटमेंट आर्टिकल्स किंवा लॉकिंग हॅण्डल्स. |
| १४ | पुढील क्षमतेचे एअर कंडिशनर्स व एअरकूलर्स व त्यांचे घटक, सुटे भाग व उपसाधने—<br>(अ) १.५ टन क्षमतेचे.<br>(ब) १.५ टनापेक्षा अधिक क्षमतेचे. |
| १५ | (अ) १६५ लीटर्स क्षमतेचे.<br>(ब) १६५ लीटर्सपेक्षा अधिक क्षमतेचे.<br>रेफ्रिजिरेटर्स, डीप फ्रिझर्स, मेकॅनिकल वॉटर कूलर्स, बॉटल कूलर्स, वॉक-इन-कूलर्स, यांसारखी सर्व प्रकारची प्रशीतनाची उकरणे व सामग्री. |
| १६ | (या अनुसूचीच्या नोंद क्रमांक १७ मध्ये विनिर्दिष्ट केले असेल त्याव्यतिरिक्त) फर्निचर, फिक्श्चर्स, पार्टिशन्स, यात दरी, सतरंजी, नमदा, तागाचे गालिचे, काथ्याचे गालिचे व सिथेटिक्स पासून बनविलेले गालिचे यांव्यतिरिक्त अंतर्गत सजावटीसाठी वापरण्यात येणारे फर्निचर, गालिचे, कार्पेटिंग व रग्ज यांसारख्या वस्तूंचा समावेश होतो.<br><br>स्पष्टीकरण.—जमिनीवरील आच्छादनाचे स्वरूप असणारी कार्पेटस् कार्पेटिंग्स व रग्ज या नोंदीखाली येतील-मग त्यांचा वापर जमिनीवर आच्छादण्याकरिता करण्यात येत असो वा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येत असो. |
| १७ | सर्व प्रकारचे धातूचे फर्निचर, फायबरग्लास, प्रबलित (रिइन्फोर्सड), प्लास्टिकपासून किंवा मुख्यत्वेकरून कोणत्याही प्रकारच्या प्लास्टिकपासून बनविलेले फर्निचर गाद्या-गिरद्याचे फर्निचर व जे फर्निचर बनवताना लॅमिनेटेड शीट्सचा वापर करण्यात आला असेल असे फर्निचर. |
| १८ | तिचाकी वाहनांसह मोटारवाहनांचा सांगाडा. |
| १९ | रेल्वेकडून पुरविण्यात येणारे आधार सांगाड्यावरील रेल्वे कोचेस. |
| २० | जहाजे, पडाव, तर, खेचहोडी, ट्रॉलर्स किंवा गाळउपसणी यंत्रे. |
| २१ | सर्व प्रकारची मुद्रित सामग्री. |
| २२ | (अ) छायाचित्रणासाठी लागणारे व इतर कॅमेरे व त्यासोबत वापरण्यात येणारे परिवर्धक, भिंगे, कागद, फिल्म व प्लेटस् व त्याचे घटक, सुटे भाग व उपसाधने व माऊंट केलेले फ्रेम केलेले किंवा अन्य प्रकारचे फोटोग्राफिक प्रिंटस्.<br>(ब) कच्च्या डिपॉझिटिव्ह फिल्म्स व प्लेटस. |
| २३ | हेलिकॉप्टर्ससहित सर्व प्रकारची विमाने व त्यापैकी कोणाचेही घटक, सुटे भाग व उपसाधन. |

(यथार्थ अनुवाद)
प. ग. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई